Vol 5 Issue 3 Sept 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore


S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts**
**ISSN 2231-5063**
**Impact Factor : 3.4052(UIF)**
**Volume - 5 | Issue - 3 | Sept - 2015**

# ‘कोळी’ जमातीच्या धार्मिक संकल्पनांचा समाजशास्त्रीय अभ्यास




*प्रा. वृषाली विलास कोल्हे*
*ए.डी.पी.एम.संचलित आर्टस, कॉमर्स व होम सायन्स महिला कॉलेज, जळगाव.*

### प्रास्ताविक :

आपला देश हा खंडप्राय असा देश असल्याने समाज आणि लोकसंख्याच्या निकषावर त्याचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून वर्गीकरण करता येते. साधारणतः आपल्या देशातील विविध जमातींचे वस्तीस्थान, सामाजिक स्वरुप, सांस्कृतिक भिन्नता आणि सभ्यता या आधारांवर विभागणी केली जाते. ही विभागणी प्रामुख्याने Primitive Society/Primitive Tribes (आदिवासी/आदिम जमाती), Rural Community (ग्रामीण समुदाय) Urban Community आणि (शहरी समुदाय) अशा तीन भागांमध्ये केली जाते. यातील ग्रामीण आणि शहरी समुदायाशी बऱ्याच अंशी सर्वांचाच जवळचा संबंध असतो. मात्र आदिवासी किंवा आदिम जमातीच्या जीवन पद्धतीशी फारसा संपर्क नसल्यामुळे त्या समाज घटकाविषयी फारच थोड्या लोकांना माहिती असते.

‘आदिवासी’ आद्य रहिवाशी ! आधी रहिवास असलेला समूह तो आदिवासी म्हणून ओळखला जातो. आदिवासी ही आपल्या देशातील मूळ निवासी जमात आहे. आपल्या देशात आर्यांच्या आगमनकाळापासूनही आधी आदिवासी जमातीचे वास्तव्य होते. असे असले तरी, या जमातीचा आक्रमक म्हणून उल्लेख वाचावयास मिळत नाही. अर्थात त्यांच्या याच औदार्याच्या धोरणाचा फायदा आर्यांनी घेतला. आक्रमक परकीय आर्यांनी या आदिम जमातींचा पराभव करून कनिष्ठ वर्गाचा उदय घडवून आणला. ऋग्वेदात याच वर्गांचा दास, दस्यू असा उल्लेख आढळतो. ह्या जमातीतील अनेक जनजातींमधील कोळी ही प्रमुख जमात होय.

### कोळी समुदायातील शाखा :



अश्मयुगानंतरच्या काळात पश्चिम किनारपट्टीच्या म्हणजेच कोकणच्या प्रदेशात कोळी लोकांनी वास्तव्य केले. या जमातीचे सागराशी नाते जुळले. प्राचीन काळापासून परकीय देशांशी भारताचा व्यापार ह्याच किनारी प्रदेशातून चालत असे. हा व्यापार सागरी मार्गाने चालत असल्यामुळे व्यापारी गलबतांवर धाडशी खलाशी म्हणून कोळी लोक काम करीत असत. तसेच किनारपट्टीवर वास्तव्य असल्यामुळे मासेमारी हाही व्यवसाय बनला. प्रामुख्याने समुद्रकिनाऱ्यावर कोळी लोकांची वस्ती असली तरी व्यवसायाभिमुख जीवनपद्धतीनुसार नद्या, तलाव, खाड्या याठिकणीही कोळी लोक वास्तव्य करू लागले. या जमातीमध्ये पुढे काल आणि स्थलपरत्वे अनेक जाती–उपजातींची निर्मिती होत गेली. असे असले तरी या जमातीमध्ये दोन वर्ग आढळतात. मासेमारी करणारे कोळी आणि शेती करणारे कोळी असे हे दोन वर्ग होत. या व्यतिरिक्त नावाडी, शिकार, जनावरे पाळणे असा व्यवसायही कोळी लोक करत. कोळी लोकांचे कुणबी लोकांशी मोठे साम्य आढळते. असे असले तरी ह्या जातीचा समावेश मागास वर्गात म्हणजेच अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला आहे. या जमातीमध्ये सोनकोळी, महादेवकोळी, आगरी, मांगेला, वैती, अहीर, बंद, भिल्ल, भिलावे, भिरले, चंची, टोकरे, हेलमार, कब्बेर, कराडे, खार, परवाली, नावाडी, कोकणा, नाखवा, बारी, सूर्यवंशी, चंद्रवंशी, वाल्मीकी, राज (डोंगर कोळी), झिंगे, मल्हार, चुमली, व्यास, धीवर, पानभरी, मराठा, मारवी, मेंदाले, मेता, मुसळे, नेहेरे, शिंग, तोकी, ठाणकर, तायडे, खिस्ती, सोलेशी व काष्टी इत्यादी शाखा असल्याचे चंद्रकांत मेहेर नोंदवितात.[1]

### कोळी जमातींचे धार्मिक स्थित्यंतरे :

प्रारंभीच्या काळात कोळी समुदायाचा समावेश हिंदू धर्मामध्ये होत असे. जाती–जमातींच्या उगमाच्या आधीच्या काळात कोळी लोकांच्या अनेक गावांच्या मिळून ज्ञातीसंस्था अस्तित्वात आल्या होत्या. त्यांच्या विभागवार ज्ञातीसंस्था असल्यातरी ते हिंदू धर्माचेच पालन करीत असत. मौर्य कालखंडात मात्र काही कोळ्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. मध्ययुगात मोठ्या राजकीय स्थित्यंतरात हा देश इस्लामी राजवटीच्या प्रभावात गेला. त्या काळात भारतीयांवर इस्लामी धर्म लादण्यात आल्याने अनेकांचे सक्तीचे धर्मांतर करण्यात आल्याने कोळी लोकांनीही इस्लामी धर्म स्वीकारला. असेच जबरदस्तीचे धर्मांतर हे पोर्तुगीज व ब्रिटिश काळात झाल्याने अनेक कोळी लोकांना बाटवून

ख्रिश्चन धर्मात ओढण्यात आले.[2]

### कोळी लोकांच्या देव–देवता :

शक, कुशाण, हुणांच्या आक्रमणाने इतर वन्य जमातींबरोबरच कोळी लोकही हिमालयात आणि सातपुडा व सह्याद्री ओलांडून दक्षिण भारतात वास्तव्य करून राहू लागले. तेव्हा या डोंगर–दऱ्याखोऱ्यात कोळी लोकांनी वास्तव्य असलेल्या ठिकाणी आपल्या देवस्थानांची स्थापना केली. पुढे होणाऱ्या स्थलांतराबरोबरच त्यांनी आपले देवही सोबत नेलेत. मुंबईत 'मुंबाई' देवीची स्थापना ही अशाच प्रकाराने झाल्याची वाचावयास मिळते.[3]

कोळी जमातीचे लोक महादेवाला मोठे महत्त्व देत असतात. संपूर्ण देशभरात महादेवाचे भक्त या जमातीत आहेत. हे लोक मोठ्या श्रद्धेने महादेवाची पूर्जा–अर्चा करीत. म्हणूनच डोंगरात राहणारे कोळी स्वतःच्या पोटजमातीचा उल्लेख महादेव कोळी किंवा मल्हार कोळी असा करत असल्याने त्यांच्यात शिवप्रती नितांत भक्तीच कारणीभूत आहे.[4]

### कोळी विठ्ठलाचे भक्त :

कोळी लोक पंढरपुरच्या विठ्ठलाचे भक्त असल्याचे काही दाखले मिळतात. शालीवाहन राजाच्या एका कोळी जमातीतील सरदाराने पंढरपूर हे गाव वसविले. तेव्हांपासून या सरदाराचे वंशज पुंडलिक आणि मल्लिकार्जुन या देवांची पूजा करतात. या देवस्थानात येणारे उत्पन्न घेण्याचा त्यांचाच हक्क मान्य झाला आहे. म्हणून इतरत्र रहाणारे कोळी आजही पंढरपूरला याच भक्तिभावाने जावून मनोभावे विठ्ठलाची पूजा करतात.

### ग्रामदेवता :

आपल्या देशात प्राचीन काळापासून गावाच्या संरक्षक देवता म्हणून ग्रामदेवतांना पुजन्याची प्रथा आहे. आजही आपल्या समाजात ह्या देवतांचे महत्त्व मोठे आहे. पूर्वापार पासून कोळी समूहामध्ये घराबाहेर पडण्यापूर्वी ग्रामदेवतेचा आशीर्वाद घेवून कौल घेतला जातो. ह्या देवतांची मंदिर किंवा मुर्त्या ह्या प्रतिकात्मक किंवा ओबडधोबड असल्याने ते वैदिककाळाच्याही आधीच्या म्हणजेच अनार्य देवता असल्याचे सिद्ध होते. त्यांना आर्य देवतांप्रमाणे सात्त्विक नैवेद्य न घालता कोंबडा, बकरा, रेडा, बैल, मद्य असा मान दिला जातो. गावात अनेक कुलदेवता असतात. त्यांच्या कृपादृष्टीमुळे रोगराई, दुष्काळ, आपत्ती सारखी संकटे येत नसतात. त्यांचा कोप होवू नये म्हणून लोक या ग्रामदेवतांना नवस करून तो यात्रा किंवा उत्सवानिमित्ताने फेडत असतात. या ग्रामदेवतांची निष्ठापूर्वक भक्ती केली असता संतुष्ट होवून त्या पावतात अशी भावना कोळी लोकांची असते. या श्रद्धायुक्त भावनेतूनच कोळी लोकांची समुद्रदेवता उदयास आली असल्याचे सांगितले जाते. (चंद्रकांत मेहेर, पृ. 109–110)

### कुलदेवता :

कोळी लोकांच्या चार कुलदेवता प्रसिद्ध आहेत.

1) शंकर, 2) भवानी देवी (अंबामाता), 3) काळभैरव (बैरीदेव), 4) खंडोबा.

या कुलदेवतांबरोबरच कोळी लोक कुमारी, धनदा, नंदा, विमला, लक्ष्मी, विख्याता, प्रावळ, ज्ञान मंगला, बाळा (आसरा) यांचीही मनोभावे पूजा करीत असतात. या देव–देवतांना नैवेद्य, द्राक्ष, खजूर, लाह्या, दूध असे सात्त्विक पदार्थ अर्पण करीत असतात.

ज्वाला ज्योती म्हणजेच महाकाली माता हे एक देवीचे प्रमुख रूप मानून तिच्याच कालिका, अन्नपूर्णा, चंडिका, हिंगळा, विंध्येवासिनी, महालक्ष्मी, सरस्वती, अंबिका, अंजनादेवी अशा नऊ स्वरुपांमध्ये या देवतेच्या पूजा केल्या जातात. अपघाती मृत्यू आलेल्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावाचे प्रतिक म्हणून श्रीफळ घरातील देव्हाऱ्यात ठेवून त्याभोवती नऊ जलपात्रे भरून पूजा करतात. असे केल्याने या मृत परंतु कर्त्या पुरुषांचा कोप आपल्या घरावर होणार नाही अशी श्रद्धा कोळी लोकांमध्ये असते.

तसेच अनेक कोळी लोकांच्या वस्त्यांमध्ये, वाड्यांमध्ये हिंगळामातेचे मंदिर आढळते. ही देवी म्हणजे चार धामपैकी एका धामाची शक्ती असल्याचे मानले जाते. ह्या पुरातन देवीचे वस्तीस्थान आज बलुचिस्थान (पाकिस्थान) येथे आहे. या व्यतिरिक्त कोळी लोक चंपावती, मरीआई, एकवीरा, प्रभावती, कळलागी, हिंगुलजा, सरस्वती ह्या सप्त मातृका म्हणजे सात बहिणी यांची एकत्रपणे पूजा करीत असतात. यांनाच सात ग्रामदेवताही मानतात. कोकणात चौल या गावी या सात बहिणी देवींची मंदिरे आहेत. या सर्व देवतांच्या मंदिरात शिवलिंगाची स्थापना केलेली असते. शिव आणि शक्ती यांचा एकत्र सहवास असल्याचे मानले जाते.[5]

### तीर्थक्षेत्रे :

एकवीरा आई ही कोळी लोकांची कुलदेवता मानली जाते. रेणुका मातेचे रूप म्हणजेच कार्ल्याची एकवीरा देवी होय. कार्ला येथील सुप्रसिद्ध बौद्ध लेण्याच्या मुखाशीच देवीचे मंदिर असून डाव्या अंगाला जोगेश्वरी देवी आहे. दरवर्षी कोळी लोक मातेच्या दर्शनाला येत असतात.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथल राम आणि महादेव ही कोळी लोकांची कुलदैवते असल्यामुळे ह्या समुदायातील लोक मोठ्याप्रमाणात ह्या तीर्थक्षेत्री येवून पुण्यपावता प्राप्त करीत असतात. तसेच हिमाचल प्रदेशातील बियास नदीच्या खोऱ्यातील कुलू–मनाली जवळील डोंगरावर महादेवाचे मंदिर आहे. येथेही कोळी लोक पूर्वीपासूनच दर्शनाला येत असतात.[6]

### धार्मिक विधी :

कोळी जमातीमध्ये आदिवासींप्रमाणे स्वतंत्र धार्मिक कल्पना आणि आचार अस्तित्वात नसून हिंदू धर्माप्रमाणेच जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे सर्व विधी पार पाडले जातात. यात कान टोचणे, जावळ काढणे, पाचवी (सटवाई), नामकरण, अंत्यविधी, उत्तरक्रिया, विधवेचा

शृंगार उतरविणे इत्यादी विधी केले जातात.

### *पाचवी (सटवाई) पूजा :*

तर बाळाच्या जन्माच्या पाचव्या दिवशी केला जाणारा विधी म्हणजे पाचवी किंवा सटवाई होय. बाळ जन्मल्यानंतरचा हा पहिलाच धार्मिक विधी असतो. यालाच सूप भरण्याचाही कार्यक्रम म्हटला जतो. या कार्यक्रमात सूपात पानविडे, बदाम, अक्रोड, हळद अशा वस्तू घेवून त्यावर सटवाईचे प्रतिक श्रीफळ ठवले जाते. या कार्यक्रमातून आपल्या कुलदेवतेस बालकाच्या पुढील आयुष्याविषयी सुखी जीवनाचे आवाहन केले जाते. पाचव्या दिवशी सटवाई बाळाचे भविष्य ठरवित असते अशी सामाजिक श्रद्धा असल्याने उपस्थित महिलांना व मुलांना घुगऱ्या (शिजविलेले द्विदल धान्य –मठ, मूग, हरभरे यापासून बनविलेल्या मुठ्या होय) आणि चणे वाटले जातात.[7]

### *नामकरण विधी :*

बाळाच्या जन्माच्या बाराव्या दिवशी जन्मवेळ, काळ, ग्रहस्थितीवरून पुरोहिताकडून नावाचे अक्षर सुचविले जाते. त्या अक्षरावरून आई–वडील किंवा आप्तेष्ट आपल्याला आवडणारे नाव ठेवतात. या विधीला नामकरण किंवा बारसे असे म्हणतात. हा विधी करतांना बाळाची आत्या ठरलेले नाव बाळाच्या कानाजवळ सांगून मग उपस्थितांसमोर घोषित करते. याप्रसंगी पेढे, बर्फी, जलेबी यासारखे गोड पदार्थाबरोबर अल्पोपहार देवून आनंद व्यक्त केला जातो. यानंतर कान टोचणे, जावळ काढणे बाळाच्या जन्माच्या बाराव्या दिवशी सोनाराकडून कान टोचून घेतात. यामागे शुभवार्ता कानी पडतात असे मानले जाते. तसेच बाळाच्या डोक्यावरील जन्मजात असलेले केस साधारणतः एक ते सव्वा महिन्यांनी कापून टाकतात. हा विधी आपल्या कुलदेवतेजवळ किंवा ग्रामदेवतेजवळ न्हावीकडून केला जातो. त्यास जावळ असे म्हणतात.[8]

### *अंत्येश्टी विधी :*

मानवी जीवनात जसे सुख असते तसेच दुःखही असते. जन्मास येणाऱ्या प्रत्येकाला मृत्यूसही सामोरे जावेच लागते. म्हणूनच अंत्येष्टी किंवा अंत्यविधी हा मानवी जीवनाचा शेवटचा विधी असतो. कोळी जमातीमध्येही हिंदू धर्माप्रमाणे मृत्यूनंतर दहन करण्याची पद्धत आहे. मृत व्यक्तीची अंघोळ घालून तोंडात तुळशीपान, सुवर्णाचा तुकडा ठेवून गंगाजल टाकले जाते. यालाच हिंदूधर्म शास्त्रानुसार शुद्धसंस्कार म्हटले जाते. या संस्कारानुसार मृतदेहास नव्या वस्त्रामध्ये दहन केले जाते. म्हणजेच शुद्ध असा मानवी देह अग्नी देवतेच्या स्वाधीन केला जातो. मृत व्यक्तीचे नातेवाईक (भाऊबंदकीतील) सुतक पाळतात. हे सुतक बारा दिवसाचे पाळले जात होते. मात्र अलिकडे परिस्थितीनुसार बदल करून सोयीनुसार कमी दिवसाचे सुतक पाळण्याचा प्रघात सुरू करण्यात आला आहे. सुतकीच्या दिवशी पिंडदान विधी पुरोहिताकडून केल्यावर सुतकी सुतकमुक्त होत असतात. या दिवशी उपस्थित राहिलेल्यांना सार्वत्रिक भोजन देण्याची प्रथा आहे.[9]

### *सारांश :*

कोळी ही आदिवासी किंवा आदिम जमात होय. आर्यांच्या आगमन काळाच्याही आधी या जमातीचे वास्तव्य भारतात होते. अतिशय शांतताप्रिय संस्कृतीचा आक्रमक आर्यांपुढे पराभव झाल्याने आर्य संस्कृतीने या पराभूत जमातीचा कनिष्ठ वर्ग निर्माण केला. ऋग्वेदात यांचाच उल्लेख दास, दस्यू म्हणून केला आहे. ही जमात म्हणजेच कोळी जनजाती होय. या जमातीचे सागराशी नाते जुळल्याने व्यापारी गलबतांवर धाडशी खलाशी म्हणून हे लोक काम करीत. त्यांच्यात पुढे काल आणि स्थलपरत्वे अनेक जाती – उपजातींची निर्मिती होत गेली. मुंबाईदेवी, महादेव, पंढरीचा विठ्ठल जेजुरीचा खंडेराव, भवानी देवी (अंबामाता), काळभैरव (बैरीदेवी) या कुलदेवतांबरोबरच कोळी लोक कुमारी, धनदा, नंदा, विमला, लक्ष्मी, विख्याता, प्रावळ, ज्ञानमंगला, बाळा (आसरा) यांचीही मनोभावे पूजा करीत असतात तसेच महाकाली माताला प्रमुख देवी मानून तिच्या अनेक स्वरूपांचीही पूजा करतात.

कोळी लाक पाचवी (सटवाई), नामकरण विधी, कान टोचणे व जावळ काढणे, अंत्येष्टी सारखे विधी हिंदू धर्माप्रमाणेच जन्मपासून तर मृत्यूपर्यंत पार पाडतात. म्हणजेच इतर आदिवासी जमातींप्रमाणे कोळी जमातीमध्ये स्वतंत्र धार्मिक कल्पना अस्तित्वात नाहीत.

### *संदर्भ :*

1.मेहेर चंद्रकांत भास्कर, कोळी समाज विहंगमावलोकन, शुभाय प्रकाशन, दादर (पूर्व), मुंबई, 2012, पृ. 30
2.तत्रैव, पृ. 67.
3.भस्नेइया आर. सी., कोली जाति का इतिहास, स्वप्रकाशन, इंदोर (मध्यप्रदेश), 2011, पृ. 175.
4.देवगावकर डॉ. शैलजा, देवगावकर डॉ. श. गो., आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन, नागपूर, 2001, पृ. 74.
5.कुलकर्णी डॉ. शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2011, पृ. 28.
6.जोशी पं. महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खंड दुसरा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, चतुर्थ आवृत्ती, 20014, पृ. 590.
7.देवगावकर डॉ. एस. जी., महाराष्ट्रातील निवडक जाती – जमाती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, व्दितीयावृत्ती, 2013, पृ. 240.[ण]
8.मेहेर चंद्रकांत भास्कर, उपरोक्त, पृ. 98.
9.सोनवणे मोतीलाल, खान्देशातील आदिवासी : कोळी जमातीचे अंतरंग, शहा प्रकाशन, शहादा, 2007, पृ. 191.



*प्रा. वृषाली विलास कोल्हे*
*ए.डी.पी.एम.संचलित आर्टस, कॉमर्स व होम सायन्स महिला कॉलेज, जळगाव.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org